१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६९

२. मा.स्थायी समिती कडील मंजूर ठराव क्र.४०३१ दि.१७/०९/२०१३

३. आदेश क्र.लेखा/१/कावि/७७०/२०१३दि.१७/०९/२०१३

४. आदेश क्र.बीपी/१अ/कावि/६८/२०१५ दि.१७/०८/२०१५

५. पत्र क्र.बीपी/१/कावि/७२१/२०१५ दि.३/०९/२०१५

६. मा.आयुक्त यांचेकडील दि.२३ /०९/२०१५ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
क्रमांक-लेखा/१अ/कावि/८४०/२०१५
दिनांक-३० /०९/२०१५

विषय :- वित्तिय अधिकार प्रदान करणेबाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाचे विभाग प्रमुख / शाखाप्रमुख यांना उपरोक्त वाचले क्र.३ चे आदेशान्वये वित्तिय अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.बांधकाम परवानगी विगागाचे कामकाजाचे स्वरुपात बदल बदल झाला असून सदर विभागाचे नाव आता,बांधकाम नियंत्रण विभाग असे करण्यात आले आहे.उपरोक्त वाचले क्र.४ वरील आदेशान्वये वाहन इंधन स्थायी अग्रिममधन पूर्वीची रक्कम रुपये १०,०००/- ऐवजी ३०,०००/- मंजूर केली असलेने व उप शहर अभियंता यांचे ऐवजी कार्यकारी अभियंता बांधकाम परवानगी अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग ('क' व 'ड' क्षेत्रीय ) यांचेकडे सर्व प्रशासकीय कामकाज सोपविले असलेने तसे वित्तिय अधिकार आदेश निर्गत करणेकामी उपरोक्त क्र.५ चे पत्रान्वये विनंती केली आहे.

सबब,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिम कलम ६९ अन्वये मी,आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी कार्यकारी अभियंता,बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग ('क' व 'ड' क्षेत्रीय कार्यालय) यांना प्रदान केलेले वित्तीय अधिकारात वाहन इंधन स्थायी अग्रिम र.रु.१०,०००/- ऐवजी ३०,०००/- वाढ करुन वित्तिय अधिकार प्रदान करणेस.तसेच उपरोक्त संदर्भिय् क्र.३ वरील आदेशान्वये उपशहर अभियंता बांधकाम परवानगी ऐवजी कार्यकारी अभियंता बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग ( 'क' व 'ड' क्षेत्रीय कार्यालय)अशी दुरुस्ती करणेस सदर आदेशान्वये मान्यता देत आहे.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रति,
बांधकाम परवानगी विभाग

प्रत- १) लेखा विभाग
२) मुख्य लेखापरिक्षण
३) संगणक प्रशासन.